Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 464 – 468
DOI: 10.5281/zenodo.10135104

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे सत्याग्रह संबंधीचे विचार

प्रा. डॉ. किशन केंद्रे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, लोकमान्य महाविद्याल सोनखेड, ता. लोहा जि. नांदेड ४३१७०८ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: kishanckendre@gmail.com

Received: 15 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

सत्याग्रह हे महात्मा गांधींच्या तत्त्वातील एक महत्त्वपूर्ण साधन आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत देश स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र भारतात लोकशाही टिकली आणि विकसित झाली याचे श्रेय सत्याग्रह साधनास द्यावे लागेल. कारण देशात सत्याग्रहामुळेच नवचैतन्य निर्माण झाले. कोणत्याही बलाढ्य सत्तेला शस्त्रबळाशिवाय आपण नमू शकतो असा आत्मविश्वास भारतीयांमध्ये निर्माण झाला. सत्याग्रहामुळे स्वतःचे हक्क प्राप्त करून घेणे आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद मिळाली. भारतीयांचे मनोधर्य वाढले सत्याग्रहाच्या रुपाने गांधीजी एकीकडे युद्धाला व हिंसाचाराला पर्याय दिला तर दुसरीकडे शोषित माणसाच्या हातात अन्यायाविरोधात लढण्यासाठी धारदार शस्त्र दिले. सत्याग्रहामुळे पाशवी शक्तीचे बळ कमी होते तर सामान्याचे अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ वाढते. सत्याग्रहात वैयक्तिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्या सोडवण्याची सुप्त ताकद असते. म्हणूनच सत्याग्रह म्हणजे समस्या किंवा प्रश्न सोडवण्याची गुरुकिल्ली आहे. सत्याग्रह हे महात्मा गांधीजींनी जगातील संपूर्ण मानव जातीला दिलेली महत्त्वाची व अनमोल देणगी आहे. अन्याय करणाऱ्या व्यक्ती आणि समाजव्यवस्था यांच्यावर अंकुश ठेवण्याची म्हणजेच अन्यायात निराकरण करण्याची प्रचंड शक्ती सत्याग्रहात असते. थोडक्यात अन्यायाविरोधात लढण्याचे सामर्थ्य व्यक्तीला सत्याग्रहामुळे प्राप्त होते. जगात वाढती लोकसंख्या, दहशतवाद, प्रदूषण, भोगवाद, मंगळवाद यातूनच मानवी जीवन भयावह व असुरक्षित नैराश्य आत्मिक तूप व हरवल्यागत बनत आहेत. यातून मानवी जीवनास बाहेर काढण्यासाठी माणूसकीचा जिव्हाळा निर्माण करण्यासाठी सत्याग्रह हा गांधी विचार आजच्या काळात अधिक उपयुक्त ठरत आहे.

**सत्याग्रहाचा अर्थ**

सत्याग्रह मूळ शब्द संस्कृत आहे. सत्य व आग्रह या दोन शब्दापासून तो झाला आहे. सत्याग्रह या शब्दाचा अर्थ सत्याचा आग्रह होय. महात्मा गांधीजींनी सत्याला चिटकून राहणे म्हणजे सत्याग्रह अशी व्याख्या सांगितली आहे. त्याच्या मते सत्याग्रह म्हणजे सत्यबळ व प्रेमळ बळ व नितीबळ होय म्हणूनच त्यांच्या मते सत्याग्रह म्हणजे आत्मिकशक्तीच्या जोरावर अन्याय व पिळवणुकीच्या विरोधात केलेली प्रतिकारक व प्रत्यक्ष कृती होय.

स्वतः कष्ट सहन करून सत्याचे रक्षण करणे म्हणजे सत्याग्रह, सत्याग्रह म्हणजे चुकीचा कायदा मोडणे होय. कोणत्याही राज्यकर्त्यांचा वा समाजाच्या चुकीच्या कायद्यामुळे हा व्यक्तीचा हक्क असते. गांधीजीच्या मते चुकीचा कायदा मोडणे हे सत्याग्रहात अभिप्रेत आहे सामाजिक आणि राजकीय ध्येय प्राप्तीसाठी अहिंसेच्या मार्गाने केलेल्या प्रतिकार म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह हा एक प्रकारचा विविध समस्यावरील उपचार होय. सत्याग्रहांमध्ये जय - पराजय यांना धाराही नाही तसेच सत्याग्रहाची परिमिती नेहमी वाटाघाटीचीच होते.

**सत्याग्रही व्यक्तीच्या पात्रता**

१. सत्याग्रही ध्येयधिष्ठ असावा.
२. सत्याग्रहींना ब्रह्मचर्याचे पालन करायला पाहिजे.
३. सत्याग्रही व्यक्तीमध्ये वैयक्तिक स्वार्थ नसावा.
४. सत्याग्रहाची परमेश्वरावर आढळ श्रद्धा असायला हवी.
५. विरोधात का बद्दल आदरयुक्त भाव असायला पाहिजे.
६. सत्याग्रहाचा आचरण हे सुद्धा असावे.
७. सत्याग्रही व्यक्तीला संपत्तीची व प्रसिद्धीची हाव नसावी.
८. सत्याग्रहात हिस्सेला कोणतेही स्थान नसावे.
९. त्याचे आरोग्य उत्तम असावे.
१०. तो भित्रा नसावा.
११. व्देश, क्रोध व घृणा यांच्या आहारी जाणारा नसावा.
१२. सत्याग्रही व्यक्तीने स्वदेशी वस्तूचा वापर करावा.
१३. सत्याग्रही व्यक्तीला खादी वस्त्र प्रदान करावे.
१४. सत्याग्रही व्यक्ती हा स्वतः फायद्याकरिता या मार्गाचा अवलंब करणारा नसावा

असे अनेक गुण सत्याग्रहीने अंगीकारले पाहिजे असे गांधीच्या मते होते

**सत्याग्रहाची साधने**

महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून भारतीयांना संघटित करण्याचे कार्य केले. सत्याग्रहाची पात्रता सर्व भारतीयांमध्ये निर्माण करून भारतातील सर्व स्त्री पुरुष, मजूर, युवक, कामगार, शेतकरी, व्यावसायिक या सर्वांना या

शस्त्राचा उपयोग भारतीय स्वातंत्र्यलढ्यास करण्याचे ध्यैर्य निर्माण केले. महात्मा गांधीजी या संदर्भात म्हणतात “मला रोज अधिकाधिक वाटत चालले आहे की, सत्याग्रह हा विशिष्ट गोष्टीवरच केंद्रित केला पाहिजे. आपण सत्ता मिळवण्याकरिता सत्याग्रह करीत आहोत. पण सत्याग्रह हा सत्याला निर्मळ करण्याकरिता असतो सत्ता म्हणजे हिंसाच. सत्ता टिकवण्यासाठी लष्कर लागते. सत्तेचा त्याग सत्याचा मुळाशी असतो. म्हणून सत्याग्रहाचा मार्गावर चालायचं पण कसल्याही प्रकारचा मोह धरून राहायचं नाही. अशा सत्याग्रहाच्या मार्गावर मार्गक्रमण करण्यासाठी पुढील प्रकारे साधने सांगितले आहेत.

**१. असहकार**

ब्रिटीश सरकारने भारतीय लोकांवर दडपशाहीचे धोरणाचा अवलंब करून अन्याय अत्याचार करण्यास सुरुवात केली होती आपला देशातील लोक ब्रिटिशांना आपल्याच लोकांवर अन्याय अत्याचार करण्यास सहकार्य करतात. त्याशिवाय परकियांना लोकांवर अन्याय अत्याचार करता येत नाही. असे गाण्यांच्या मते होते. जोपर्यंत अन्याय - अत्याचारास सत्तेला विरोध करत नाही तो पर्यंत अन्याय सहन करावा लागतो. त्यामुळे अन्यायी - अत्याचारी सत्तेला नष्ट करण्यासाठी सहकार्य करणे सोडून दिले पाहिजे असे गांधीजींचे मत होते म्हणूनच गांधीजींनी 1920 ते 21 मध्ये असहकार चळवळीला प्रारंभ केला. त्यात पुढील बाबींचा समावेश होता 1. पदव्याचा त्याग 2. सरकारी कार्यक्रमावर बहिष्कार 3. सरकारी शिक्षण संस्था कोर्ट विदेशी वस्तूवर बहिष्कार 4. भारतीय सैनिका क्रोर कामास नकार अशा तऱ्हेने गांधीजींनी अत्याचारी शासन नष्ट करण्यासाठी सरकारची असहकार लढा पुकारला.

**२. सविनय कायदेभंग**

महात्मा गांधीजींनी 1930 - 31 मध्ये ब्रिटिश सरकार विरोध सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. राज्यकर्ते जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करून राज्यकारभार करत असेल तर जनतेने राज्यकर्त्याची कायदे पाळू नये असे गांधीच्या मत होते. कायदेभंग करताना विनयशीलता ठेवावी. गांधीजींनी सरकारला अहिंसात्मक मार्गाने सरकारला अन्याय जुनी कायद्याची जाणीव करून दिली.

**३. देश त्याग करणे**

जर एखादा राज्यकर्त्याच्या अन्याय अत्याचारामुळे जीवन जगणे असह्य होत असेल, सरकारकडून अपमान स्पद वागणूक मिळत असेल आणि अहिंसात्मक मार्गाने त्याचा प्रतिकार अशक्य झाला असेल देश त्याग या सत्याग्रहाचा अवलंब करावा.

**४. हरताळ पाळणे**

गांधीजीच्या मते हरताळ स्वेच्छेने व हृदय परिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकांनी हरताळाचा मार्ग स्वीकारावा. राज्यकर्त्यांच्या व लोकांच्या निदर्शनास एखादी गोष्ट आणून देणे या हेतूने हरताळ पाळला जातो. हरताळ करणाऱ्या जनतेस आपली जीवनावश्यक्य व इतर कामे सुद्धा करता आली पाहिजे. हरताळ सतत करू नये कारण या मार्गाचा सतत अवलंब केल्यास त्याचे महत्त्व संपुष्टात येऊ शकते.

### ५. उपोषण

उपोषण हे सत्याग्रहाचे सर्वात प्रभावी साधन आहे असे गांधीजी मानतात उपोषण मार्ग हा शुद्धता, स्वयशितस्त, व श्रद्धा या आधारावर महात्मा गांधीजींनी हा मार्ग लोकप्रिय व प्रभावि केला आहे. उपोषण हे साधन अतिशय आवश्यक असताना वापरावयाचे असून त्याच्या आत्माशुद्ध व अनुशासन प्रिय आहे तीच व्यक्ती उपोषण करू शकते. पण त्या उपोषणामागे स्वार्थी भूमिका नसावी असे गांधीजींना वाटते. म्हणून गांधीजींनी एकवी दिवसाचे केलेले उपोषण प्रसिद्ध आहे.

### ६. बहिष्कार

बहिष्कार हे सुद्धा सत्याग्रहाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. बहिष्कार म्हणजे जनमनाची अवहेलना करणाऱ्याना सहकार्य न करणे होय. महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाचा अंतर्गत बहिष्काराचा वापर केला. कारण भारताच्या स्वातंत्र्यामध्ये बहिष्कारचा वापर परकीय सत्ता, विदेशी वस्तु, न्यायव्यवस्था, शिक्षण, राहणीमान , रीतीरिवाज व विदेशी वस्तूवर बहिष्काराचा वापर केला गेला. हे करत असताना गांधीजींनी अहिंसात्मक मार्गाचा आग्रह केलेला दिसून येतो.

### ७. धरणे

धरणे हे सत्याग्रहासाठी उपयुक्त तंत्र आहे. हा प्रतिकाराचा नैतिक मार्ग असून याचा वापर सनदशीर मार्गाने केला पाहिजे संस्थेसमोर ठिय्या देणे होय. धरणे धरण्याचा हेतू आपल्याकडे समाजातील अन्य लोकांचा लक्ष वेधण्याचा असतो. धरणे धरताना हिसात्मक मार्गाचा दबाव, धमकी, जाळपोळ घेराव इत्यादी गोष्टीचा वापर करू नये.

महात्मा गांधीजींच्या मते, सत्याग्रह देशांमध्ये लोकांच्या विरुद्ध होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध उपयोगात आणले जातो सत्याग्रह हे परकीय आक्रमण रोखण्याचे एक ते उपयुक्त साधन आहे. आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला मार्गानुसार आक्रमण कर्त्याशी असहकार पुकारावा आणि दुसरा मार्गानुसार नि:शस्त्र सत्याग्रहानी आक्रमणकृत्याशी तोंड द्यावे. हिंसेचा अवलंब न करता प्रतिकार करावा. नि:शस्त्र सत्याग्रहांना मृत्युमुखी पडताना पाहून आक्रमणकर्त्यांचे  हृदय द्रवल्यावाचून राहणार नाही या दोन मार्गाने निर्दयी आक्रमणकर्त्याला जिंकता येते.

### सत्याग्रहाचे महत्त्व

1. अन्याय करणाऱ्या व्यक्तीवर अंकुश ठेवता येतो.
2. लोकांना जन आंदोलनात सहभागी करून घेऊन अन्याय अत्याचाराला वाचा फोडता येते.
3. सामाजिक व राजकीय  परिवर्तन घडवून आणण्यासाठीचे प्रभावी साधन आहे.
4. अहिंसा मार्गाने अन्यायातील अत्याचारी सरकारला त्यांच्या अत्याचाराची जाणीव करून देता येते.
5. अन्यायाचे निवारण करून आत्मबल वृद्धी करता येते.

सत्याग्रह ही संकल्पना गांधीजींनी देशालाच नाही तर संपूर्ण विश्वाला दिलेली महत्त्वाची देणगी आहे. गांधीजींनी सत्याग्रहाचे विविध मार्ग सांगून स्वतःच्या मार्गाचा अवलंब केला. केवळ देशांतर्गत बाबीसाठी सत्याग्रहाचा मार्ग न वापरता ब्रिटिश सत्तेला प्रतिकार करण्यासाठी या मार्गाचा वापर त्यांनी केला. अन्यायी, अत्याचारी व जुलमी सत्तेचा विरोध करण्याचा हा अहिंसात्मक मार्ग म्हणजे एक अथिनव कल्पना आहे. मारंगे नही, लेकिन मानेंगे नही. या निर्धाराने सत्याग्रहाचा प्रयोग केला जावा. असे त्यांची धारणा होती. हिंसे शिवाय, शस्त्रा शिवाय लढाई जिंकता येते हे त्यांनी जगाला दाखवून दिले. सत्याग्रही साधनाचा अवलंब करून गांधीजींनी ब्रिटिश सत्तेला विरोध करून भारताला स्वातंत्र्य प्राप्त केले. मानवतेच्या विशाल दृष्टिकोनातून गांधीजींनी अहिंसात्मक मार्गाने अन्यायाला प्रतिकार करण्याचे सामर्थ्य भारतीय जनतेमध्ये निर्माण करून त्यांना त्यांच्याच आत्मसाधनेची व आत्मशक्तीची जाणीव करून दिली.

**संदर्भ सुची**

1. डॉ. अनिल कठारे, आधुनिक भारताचा इतिहास, 2018 विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.
2. जाधव एस.जी., भारताचा इतिहास (1850-1950) (2005) संस्कृती प्रस्तकालय, नांदेड.
3. भारदे, बाळासाहेब : गांधीविचार मिमांसा: महाराष्ट्र गांधी स्मारक, (1943) निधी प्रकाशन पुणे.
4. डॉ. ज.रा. शिंदे, भारतीय राजकीय विचारवंत, 1999, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद.
5. तांदळे डी.आर. भारतीय विचारवंत, 2005 चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
6. कुभार नागोराव महात्मा गांधी विचार दर्शन, 1995, प्रबोधन प्रकाशन, लातूर.
7. डॉ. अनिल कठारे, आधुनिक भारताचा इतिहास 2015 प्रशांत पब्लिकेशन, जळगांव.